# ग्रामस्वराज्य हा खेडयाचा जन्मासिद्ध अधिकार आहे

साम्ययोग दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ८२] सेवाग्राम, शुक्रवार ता. १२ जून १९६४ [मूल्य ५ न. पै.

## सर्वोदय रिपब्लिक स्थापन करणे हे आमचे ध्येय

( विनोबा )

(जऊरवाडा येथे ता. ६।६।६४ ला आर्वी तालुक्यात ग्रामदान सप्ताहात भाग घेण्यासाठी महाराष्ट्रातील १००–१२५ कार्यकर्ते जमलेले होते. त्यांचे समोर विनोबांनी दुपारी साडेचार वाजता केलेले प्रवचन.)

२५ डिसेंबर १९६२ साली ख्रिस्त जयंतीचे दिवशी पंडितजीं व मी दीड पावणेदोन तास बोललो होतो. त्यांच्यात व माझ्यात गाढ अनुराग होता. गांधीजींच्या मृत्युनंतर आमचे चळवळीबाबत जे मतभेद असत ते तुम्ही नेहरूजी समोर का प्रगट करात नाही असे मला माझे मित्र विचारित असत. मतैक्याचे मुद्दे मात्र तुम्ही सांगता आणि विरोध प्रगट करावा लागला तर तो अगदी सौम्यपणाने तुम्ही प्रगट करता तेव्हा तुमच्या मनात नेहरूजी बाबत Soft Corner (मऊ कोपरा) आहे असेहि ते म्हणत. माझे मित्र समाजवादी, जनसंघ, कम्युनिस्ट इ. सर्वच पक्षात आहेत. मी त्यांना उत्तर देत असे की नेहरूजीबद्दल माझ्या हृदयाचा केवळ एक कोपराच मऊ नाही तर माझे संबंध हृदयच त्यांच्या बाबतीत मऊ आहे.

### त्यांची भेट राहून गेली

मी परवा सभेत म्हणालो राजनीतीत काम करणारा असा निर्वैर नेता मी पाहिला नाही. गांधीजी होते त्यांना मी निराळ्या कोटीत टाकतो, पण जग ज्यांना राजनीति विशारद म्हणते त्या पंडितजी इतकी निर्वैर वृत्ति अन्यत्र पाहण्यात नाही. इतका आदर, अन्योन्य अनुराग असतांना आमची भेट मात्र क्वचित व्हायची. मी पदयात्रेत असल्यामुळे त्यांनाच माझ्या भेटीला यावे लागत असे. एकपक्षी त्यांना माझ्या भेटीला यावे लागे. गांधीजी गेले तेव्हा मीच त्यांच्याकडे जात असे. ते माझ्यापेक्षा वडील होते. पण ह्या बारा वर्षात त्यांनाच माझ्याकडे यावे लागले. त्याने मला संकोच वाटायचा पण त्याला माझा इलाज नव्हता. एक महिन्यापूर्वी पंडितजींनी इच्छा व्यक्त केली की दिल्लीला मी त्यांना काही प्रश्नासंबंधी भेटावे. परंतु त्या प्रश्नाबाबत मी माझे विचार त्यांना पत्र व्यवहाराने कळविले पण मी स्वत: गेलो नाही. आता ते देहमुक्त झाले. आता त्यांची आमची भेट अव्यक्तरुपाने होईल. पण चित्तात राहून गेले की भेट झाली नाही. त्यांच्या मृत्यूनंतर पुष्कळ लोक दिल्लीला गेले. मी गेलो नाही. मी विचार केला की नेहरूजीनी प्रेस कान्फरन्स मधे सांगितले 'मला पुष्कळ अवधि आहे' आणि पाच दिवसात गेले; म्हणजे तिकडचे आमंत्रण केव्हा येईल ह्याचा नेम नाही. तेव्हा प्राप्तकर्तव्य करीत राहणे हीच त्यांच्याविषयी सर्वोत्तम आदर व्यक्त करण्याची पद्धत मी मानली. ज्या छायेत आम्ही बसलो होतो तो मोठा पुरुष गेला.

### पोरकटपणा सोडून पोक्त विचार करणे आले

इतक्या लवकर आम्ही त्यांचे मूल्यमापन करू शकणार नाही. अशोकाच्या मालिकेत त्यांचे नाव राहील. ते विश्वमानव होते. व राज्यनेतेहि होते. लोकनेता गेल्यावर तुमच्या आमच्यात काही अंत: परिक्षण, दोष परिक्षण झाले पाहिजे. आणि दोष विचारपूर्वक दूर केले पाहिजेत. पुष्कळ वेळा असे असते की मोठा मनुष्य मार्गदर्शक असतांना आम्ही पोरकटपणाने वागतो. परंतु तो गेल्यावर पोक्तपणाने विचार करावा लागतो.

### व्यापक विचार–विशाल हृदय

सर्व बाजूने विचार केला असता बाहेरील व आतील संकटे दूर करण्याकरिता; व विश्वशांतीचे भारताचे जीवितकार्य पूर्ण होण्यासाठी; हजारो ग्रामदाने आवश्यक आहेत. अनेक जाति, धर्म, विविधता हा भारताचा गौरव विसंगति नाही– विरोध नाही. आमच्या लक्षात आले नाही तर ही विचित्रता मारक होईल. सर्वांच्या गुणांचा मेळ बसेल अशी बुद्धि, चित्ताचे वळण, आत्मैक्याकडे प्रवृत्ति असली तर ही विविधताच भारताची शक्ति ठरेल. सामंजस्य, अेकसूत्रीपणा साधला तर ती शक्ति होईल.

### तरच भारत फळेल फुलेल

मागे मी काश्मिरात गेलो होतो. तेथील फॉरेस्टर (जंगल अधिकारी) सोबत होता. मी त्याला विचारले की येथील जंगल विशेष वाढलेले दिसते. तो म्हणाला 'ज्या वनात अनेक जातीची झाडे असतात ते जंगल फार वाढते. अेका जातीचे जंगल तितके वाढत नाही.' मला वाटले भारत असेच जंगल आहे. हिंदू-ख्रिस्ती; ब्राम्हण-महार; काही तेलगू-तामिल; अशी अनेकानेक विविध झाडे-विविध वृत्ति त्यामुळे भारत फळेल फुलेल हा एकदम उद्‌गार माझा निघाला.

मी भारतभर फिरतो. काही प्रांतात माझ्या प्रत्येक शब्दाचे भाषांतर करावे लागले; तरी त्यांनी मला आपलेच मानले व मलाहि वाटले आपण आपल्या घरीच आहोत. ही जी गुप्त एकता अंतर्गत एकता आहे ती प्रगट झाली पाहिजे. आणि व्यापक रुपाने प्रगट झाली पाहिजे.

### खेड्यांची गुलामी हटवा

स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार ही १९१५ साली टिळकांनी घोषणा केली. व ३२ वर्षानंतर ती सार्थ झाली. तिला आता अधिक विशाल अर्थ आला पाहिजे. म्हणजे ग्रामस्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे ही स्थिति लोकांच्या लक्षात यावी. आज पराधिन गावे व स्वाधीन देश ही अवस्था आहे. पूर्वी मोंगलाच्या वेळेस स्वाधीन गावे व पराधिन देश होता. इंग्रजांच्या काळात देशहि पराधिनि व गावेहि पराधिनि होती. आता नेहरू राज्यात देश स्वतंत्र पण गावे परतंत्र होती. आता गावेहि स्वतंत्र व देशहि स्वतंत्र; म्हणजे स्वतंत्र गावांचा स्वतंत्र देश आपल्याला करायचा आहे. जसे सोविएट रिपब्लिक तसे सर्वोदय रिपब्लिक हा दिव्य आदर्शवाद आमच्या समोर आहे.

### त्यासाठी खेड्यात मिसळावे लागेल

लोक मला विचारत असत की तुम्ही पायी का फिरता ? मी म्हणत होतो पूर्वी देश परतंत्र होता तेव्हा कलकत्ता, पुरी, मद्रास, बंगलोर, मुंबई, अहमदाबाद नागपूर, जबलपूर, जयपूर, लाहोर, श्रीनगर, दिल्ली, लखनौ, पाटना, गोहत्ती अशी दहा पंधरा शहरे घेऊन प्रचार केला की देशव्यापी चळवळ व्हायची. खेड्यात फारसा प्रचार नव्हता. गांधीजींनीच खादी व अस्पृश्यता निवारणाच्या निमित्ताने काही खेड्यात प्रवेश केला होता. त्यावेळी ज्यांनी स्वराज्य गमावले त्यांनाच कमवायचे होते. ते मध्यमवर्गाला कमवायचे होते. तेव्हा त्यांना आगगाडी व इंग्रजी भाषा उपयोगी पडली. पण आता ग्रामस्वराज्य आणायचे आहे. तेव्हा गावात वणवण भटकावे लागेल, त्यांच्या पद्धतिप्रमाणे त्यांच्या सारखे व्हावे लागेल, तरच हृदयाशी हृदय जुळेल. मी विमानात फिरलो असतो तर हवाच मिळाली असती जमीन मिळाली नसती.

### ईश्वरी सहाय्य म्हणूनच पदयात्रा संकटातून पार पडली

ईश्वराची इच्छा असती तर मी बुडालो असतो, डोंगरावरून पडलो असतो, तीन वाजता अंधारात निघतो. दोन कंदील असतात. ते विझले की माझे काम समाप्त. फ्रेंच कवीने एक काव्य लिहिले आहे. त्यात अभिमानाने तो आपल्या देशाच्या गुणांची स्तुति करतो आणि त्याबरोबर एकेका देशाच्या दोषाची

निंदा करतो. तेव्हा मी कल्पना केली की भारताबद्दल तो काय लिहिल ? तो लिहिल फ्रान्समध्ये भारतासारखे साप नसतात. तो कवि येथील शेतकऱ्याबरोबर रात्री काम करू शकेल का ? गुरे चारू शकेल ? गवत कापू शकेल ? त्याला सर्वत्र सापाचेच भय राहील. आमच्या बंगालच्या पदयात्रेत एका कार्यकर्त्याला साप चावला. खेड्याचे लोक म्हणाले घाबरू नका. त्यांनी काही औषधी दिल्या भक्तीने गीत म्हटले; निःसंशय विषारी साप होता तो ! पण तो कार्यकर्ता बरा होऊन दुसऱ्या दिवशी पदयात्रेत सामील झाला. चार चार महिने पावसाळ्यात सबंध जगाशी संबंध तुटतो तरी हिंमतीने लोक राहतात. तेव्हा त्यांच्या हिंमतीचा अंश आमच्यात हवा. नाहीतर त्यांच्यात कसे मिसळणार ?

बिहारात भयंकर पूर आले होते. असा पूर पूर्वी कधीच आला नव्हता असे लोक म्हणाले. सतत कित्येक दिवस पुराच्या पाण्यातून पदयात्रा चालली. दिल्लीवरुन मला भेटायला आलेले लोक १२ मैलावरूनच परतले. त्यावेळी माझे भाषण ऐकण्याकरिता लोक नावेने येत. तीनशे तीनशे होड्या येत. तशाच अवस्थेत सभा झाल्या व लोक जमीन दान देऊन गेले. मी त्यांना सांगितले संकटाशी सामना एक एकट्याने होईल का ? त्याचा भारतावर परिणाम झाला.

### आता छोट्यांनी मिळून देशकार्य करण्याची वेळ

गांधी गेले, नेहरू गेले. आता कोण आहे ? छोट्यांनी मोठे व्हावे. छोट्यांनी मिळून नेतृत्व करावे. गणनेतृत्वाचे दिवस आता आले आहेत नेत्यांचे दिवस संपले आहेत. मी अशी आशा करतो की तुम्ही आम्ही स्फूर्तीने काम करू. त्याने त्यांच्या आत्म्याला संतोष होईल. पंडित नेहरूंनी लिहून काय ठेवले आहे ? माझी राख वरून शिंपडा (अश्रू) आणि ती भारतातील शेतात पडू द्या. म्हणजे हचा भारतात मी विलीन होऊन जाईल. मला आठवण झाली वर्डस्वर्थच्या कवितेची. तो म्हणतो माझे स्मारक कसे कराल ? माझे खेडे गाव जेथे मी राहत असे तेथे टेकडीवर दगड होते. त्यातील चांगले होते ते पाथरवटांनी हलविले. तरी तेथे तो जो ओबड धोबड दगड आहे तो माझ्या स्मारकाचा दगड समजा व त्यावर लिहून ठेवा 'One of the many' अनेकांपैकी एक (काही काळ स्तब्ध.)

### शक्य कोटी विरुद्ध योग्य कोटी

मी जेव्हा म्हणतो भारतातले प्रत्येक गाव ग्रामदान झाले पाहिजे तेव्हा म्हणतात हे शक्य कोटीतले आहे काय ? मी म्हणतो योग्य कोटीतले आहे. ते करणे पुरुषार्थाचे काम. ईश्वराला अशी कामे करायची असतात. आतापर्यंत पाच सहा हजार गावे झाली तर पाच लाख गावे व्हावयाला किती वर्षे लागतील असे विचारणारे आहेत. मी त्यांना विचारतो आमच्या गावातील आंबे पिकायला पंधरा दिवस लागतात तर भारतातील पांच लाख खेड्यातील आंबे पिकायला किती दिवस लागतील ?

तेव्हा एक दिवस निश्चित करा. त्यासाठी भूमिका तयार करावी लागते. तो प्रयत्न चालला आहे.

---

## कस्तूरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, विदर्भ शाखा

**कस्तूरबाधाम, माधान**
**जि० अमरावती**

निवेदन–

कस्तूरबाट्रस्ट विदर्भ शाखा माधान हचा संस्थेतर्फे चाललेल्या कस्तूरबा कन्डेन्स्ड कोर्स वर्गासाठी विद्यार्थिनीवर देखरेख करण्यासाठी व त्यांचे वर्ग घेण्यासाठी एका ग्रेज्युएट भगिनीची जरूर आहे. तरी गरजू स्त्रियांनी हचा जागेसाठी अर्ज करावेत.

अर्जाची शेवटची तारीख १५ जून राहील. तरी त्वरित अर्ज करावेत. अनुभवी भगिनींनीच अर्ज करावेत. वेतन सरकारी नियमानुसार दिले जाईल.

अंडर ग्रेज्युएट प्रौढ भगिनींनी पण अर्ज करण्यास हरकत नाही. अर्ज खालील पत्त्यावर पाठवावेत.

**पत्ता :**
संचालिका, कस्तूरबा कन्डेन्स्ड कोर्स विद्यालय, माधान. जि. अमरावती

विनीत
शां. अत्रे
संचालिका

(मागील अंकाच्या पान २ वरून)

## पंडित जवाहरलाल नेहरू जीवन-वैशिष्ट्ये

आंतरराष्ट्रीय राजकारणात तर पंडितजींनी जगाला नवीन धडा घालून दिला आहे. त्यांचे ह्या बाबतीतील तटस्थतेचे धोरण जरी प्रथम प्रथम जगातील राष्ट्रांना पटले नाही किंवा त्यातील मर्म कळले नाही. तथापि कालांतराने त्यांचे तेच धोरण बरोबर आहे अशी त्या राष्ट्रांची खात्री झाली. टीकेला न जुमानता पंडितजी आपल्या तटस्थतेच्या धोरणाला शेवटपर्यंत चिकटून राहिले. ह्याचा परिणाम असा झाला आहे की आशिया आणि आफ्रिका हचा खंडातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी हचाच धोरणाचा अवलंब केला आहे. आता तर अमेरिका आणि रशिया सारख्या प्रमुख राष्ट्रांना सुद्धा तटस्थतेच्या धोरणाचे रहस्य, महत्व आणि सुपरिणाम हचांची जाणीव होऊ लागली आहे. पंडितजींच्या तटस्थतेचा हा मोठा विजय होय.

पंडितजींनी जगांतील सर्व प्रमुख देशांना भेटी दिल्या आहेत, तेथील परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण केले आहे, ते अध्यात्मवादी स्वतःला म्हणून घेत नसूनहि, आत्मियतेने सर्वांकडे पाहण्याची दृष्टि त्यांना लाभली होती. दृष्टि अर्थात्च अत्यंत व्यापक आणि विशाल होती. त्यामुळे देशांत किंवा देशाबाहेर जेव्हा एखादा समाज किंवा एखादा देश संकुचित धोरणाचा अवलंब करी, तेव्हा त्याबद्दल त्यांना अत्यंत चीड येत असे. देशात जेव्हा, हचा संकुचित धोरणामुळे जातीय दंगे उद्भवत तेव्हा त्यांना अत्यंत दुःख होत असे, आणि लोकांच्या हचा संकुचित वृत्ति आणि धोरणाबद्दल त्यांना अत्यंत दुःख होत असे. देशाचे अंतर्गतशत्रु म्हणजे हे जातीयवादी लोक होत असे त्यांचे ठाम मत होते.

पंडितजींनी गांधीजींच्या अहिंसेचा जसा अंगिकार केला त्या 'प्रमाणे साध्य शुद्ध असले तरी ते साधण्यासाठी साधनेहि शुद्ध वापरली पाहिजेत'–हचा गांधीजींच्या तत्वाचाहि त्यांनी आपल्या राजकारणात आणि राजकारभारांत कसोशीने अवलंब केला.

पंडितजींना आपल्या ऐन तारुण्यात सुमारे बारापेक्षा अधिक वर्षे कारागृहात घालवावी लागली. हचा कारावासात असतांना ते स्वस्थ बसले नाहीत. त्याच काळात त्यांनी आपले 'आत्मचरित्र' 'जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन' 'भारताचा शोध' वगैरे सहाशे सातशे पानाची पुस्तके इंग्रजीत लिहिली. ही पुस्तके जगभर अत्यंत लोकप्रिय झाली.

भारताच्या कॉंग्रेसच्या अध्यक्ष पदाचा मान पंडितजींना तीनदा मिळाला, आणि 'स्वतंत्र भारता'च्या पंतप्रधानकीची वस्त्रे त्यांनी एकसारखी–अखंड–सतरावर्षे परिधान केली ! जगाच्या इतिहासात अशी उदाहरणे क्वचित्च आढळून येतील. राष्ट्राच्या धकाधकीच्या मामल्यात किती धैर्य, किती निर्भय आणि किती डोके शांत ठेवावे लागते, हचाची कल्पना 'जावे त्यांच्या वंशा' तेव्हा कळे !

पंडितजी हे गांधीजींचे राजकीय वारस आणि पू. विनोबाजी आध्यात्मिक वारस ! भारताच्या सद्भाग्याने दोघांना परस्पराबद्दल अत्यंत आदर आणि अकृत्रिम प्रेम असल्याने परस्परांच्या कार्याला परस्परांचा नैतिक पाठिंबा मिळाला. त्यामुळे देशाची प्रगति होण्याला मदतच झाली.

* * *

## आर्वी तालुक्यातील नवीन ग्रामदाने

**सोनेगाव, यनगाव, चिंचोली, उमरी, पिंप्री, दाभा, गोदनी.**

आजपर्यंत आर्वी तालुक्यात एकूण ग्रामदानांची संख्या ३६ झाली आहे. व वर्धा जिल्ह्यातील एकूण ग्रामदान संख्या ५० झाली आहे.

संपादक:– श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:– श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:– श्री. वामनराव पाचपांडे, नाई तालीम मुद्रणालय, सेवाग्राम.
स्वामित्व:– महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग : दैनिक पुरवणी ता. १२-६-६४ अं. ८९ र. नं. एन्. २९५

विनोबा वार्ता, सेवाग्राम जि. वर्धा (महाराष्ट्र राज्य)

श्री. ________________